आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५  मार्च २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाइप गॅस सुविधा उपलब्ध असलेल्या विभागांमध्ये एलपीजी पुरवठा बंद करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ विधीमंडळात एकमतानं मंजूर

- आगामी आर्थिक वर्षात भारताचा GDP वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा एस अँड पी ग्लोबलचा अंदाज

**आणि**

- आदिवासी समाजासाठीच्या पहिल्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धांचं आज छत्तीसगडमधे उद्घाटन

<><><><><>

पाइप गॅस सुविधा उपलब्ध असलेल्या विभागांमध्ये एलपीजी पुरवठा बंद करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पीएनजी सुविधा उपलब्ध असूनही एलपीजीवर अवलंबून राहणाऱ्या ग्राहकांना ३ महिन्यात पीएनजीची जोडणी घ्यावी लागेल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं काल प्रसिद्ध केलेल्या दिशानिर्देशात म्हटलं आहे.

पाइप गॅस जोडणी देणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसेल तर पुरवठादाराकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यावर एलपीजी जोडणी कायम ठेवता येईल, असं या निर्देशात स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

देशात इंधनाची कमतरता नसल्याचा निर्वाळा भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियमनं आज दिला. एलपीजी, कच्चं तेल, पेट्रोल, डिझेल आणि विमानाच्या इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा साखळी सुरळीत आहे,

असं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात इंधनाचा तुटवडा असल्याच्या बातम्या पसरत असून त्या पूर्णपणे निराधार आहेत. नागरिकांनी घाबरून जाऊन इंधनाचा साठा करू नये असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गंत तसंच इतर योजनांतंगत दिल्या जाणाऱ्या एलपीजी सिलेंडरच्या नोंदणीचा कालावधी वाढवल्याच्या बातम्या समाज माध्यमावर प्रसारित होत आहे. मात्र या बातम्या खोट्या आणि निराधार असल्याचं स्पष्टीकरण पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं दिलं आहे. शहरी भागात सिलेंडर नोंदणीसाठी २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचा कालावधी कायम असून त्यात कोणताही बदल केलेला नाही.नागरिकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर चर्चा करण्यासाठी सरकारने आज संध्याकाळी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. दरम्यान, आज विरोधी पक्ष सदस्यांनी देशात सुरू असलेल्या गॅस टंचाईवरून संसद परिसरात निदर्शनं केली.

<><><><><>

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक विधानपरिषदेत मांडलं आणि यातल्या तरतुदींची माहिती दिली. अशा प्रकारचे विशेष कायदे आणि तरतुदींच्या दुरुपयोगासंदर्भातल्या घटनांचं विश्लेषण करणं, त्यानुसार नियम किंवा कायद्यांमध्ये बदल करणं किंवा संरक्षण देण्याबाबत शिफारशी करण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांच्या

अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. या समितीत एका वरिष्ठ महिला अधिकाऱ्याचाही समावेश असेल.

विदर्भातल्या प्रत्येक जिल्ह्यात व्याघ्र प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं वनमंत्री गणेश नाईक विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, किशोर जोरगेवर यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात छत्तीसगड राज्यातून हत्तीचा कळप आला असून यामुळे शेतपिकाचं मोठं नुकसान झाल्याचं नाना पटोले यांनी उपस्थित केला. या कळपाला छत्तीसगडकडे जाण्यासाठी मार्ग खुला करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली. यावर कारवाई केली जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं होतं.

मुंबईच्या एशियाटिक सोसायटीची प्रलंबित निवडणूक येत्या २ ते ३ महिन्यात पारदर्शक पद्धतीनं घेतली जाईल, असं आश्वासन मंत्री आशिष जैस्वाल यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं.

महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक २०२६ आज विधानपरिषदेत मंजूर झालं. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता दुसरी सुधारणा विधेयक २०२६ विधानपरिषदेत मंजूर झालं.

<><><><><>

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन २०२५ या धोरणांतर्गत वर्ष २०३५पर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बस इलेक्ट्रिक करायची योजना असल्याचा पुनरुच्चार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत केला. राज्यातल्या पर्यटनाबाबत कलम २६० अन्वये सरकारनं मांडलेल्या प्रस्तावाच्या वेळी ते बोलत होते. महामंडळाकडच्या ८ वर्षं जुन्या बसचं रूपांतर हायब्रीड किंवा इलेक्ट्रिक बसमध्ये करण्याचं धोरण महामंडळानं हाती घेतलं असल्याचंही त्यांनी सांगितलं. याबाबत ते म्हणाले.

**होल्ड बाईट**

<><><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताचा २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी GDP अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा अंदाज स्टँडर्ड अँड पुअर्स ग्लोबलनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात व्यक्त केला आहे.

भारत जगातल्या सर्वात वेगानं वाढणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक राहील. जागतिक स्तरावर ऊर्जा किमतींमध्ये अस्थिरता कायम असली तरी महागाई दर नियंत्रणात राहून तो सुमारे ४ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत राहील, असा अंदाज अहवालात व्यक्त केला आहे.

<><><><><>

कोविडनंतरच्या काळात देशभरात सुमारे १ हजार २४ नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यात आल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. यासोबतच सध्या सुरू असलेल्या गाड्यांना ४ हजार ६५१ नवीन डबेही जोडण्यात आले आहेत. तिकीट आरक्षणाची प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी रेल्वेने अनेक उपाययोजना केल्या आहेत, असं ते म्हणाले..

**होल्ड.. बाईट - अश्विनी वैष्णव**

रेल्वे मार्गांच्या सुरक्षेसाठी सरकार १ लाख २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत असून सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे रेल्वे अपघातांमध्ये ९० टक्के घट झाली आहे,असं रेल्वे मंत्री यावेळी म्हणाले.

<><><><><>

सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाच्या सचिवांची समिती स्थापन करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. राज्यातला कांदा प्रश्न कायस्वरुपी निकाली काढण्यासाठी दीर्घकालीन पर्यायांची अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. कांदा प्रश्नाबाबत

विधान भवनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. कांदा व्यापारातले गैरप्रकार रोखणे, कांद्याची निर्यात वाढवून त्याचे दर स्थिर ठेवणे आदी केंद्र सरकारशी निगडित विषयांबाबत केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्याबरोबर बैठक घेणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते.

<><><><><>

आदिवासी समाजासाठीची पहिली खेलो इंडिया क्रीडा स्पर्धा आजपासून छत्तीसगडमधे सुरू होत आहे, ती ३ एप्रिल पर्यंत चालेल .केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री मनसुख मांडविय यांच्या हस्ते आज संध्याकाळी रायपूर इथं या स्पर्धांच उद्घाटन होणार आहे . छत्तीसगडमधे रायपूर, जगदलपुर आणि अंबिकापुर या तीन शहरात या स्पर्धा होणार असून, ॲथलेटिक्स, हॉकी, फुटबॉल, तिरंदाजी, कुस्ती, भारोत्तोलन आदि ७ क्रीडाप्रकारांचा त्यात समावेश आहे. मल्लखांब आणि कबड्डी या खेळांचे प्रदर्शनीय सामने होतील. देशातली ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतले मिळून ३ हजारांपेक्षा जास्त आदिवासी खेळाडू या महोत्सवात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते काल मुंबईत १५ उत्कृष्ट युवा उद्योजक आणि नवोन्मेषकांना इंडिया टुडे समूह आणि महिंद्रा तर्फे 'ड्रायव्हर्स ऑफ चेंज' २०२६' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रभावी उद्योगांमध्ये रुपांतरित केल्याबद्दल तसंच देशातल्या स्टार्टअप संस्कृतीला चालना दिल्याबद्दल राज्यपालांनी अभिनंदन केलं.

<><><><><>

नाशिक जिल्हा परीषदेचा ५९ कोटी १४ लाख रूपयांचा अर्थसंकल्प आज सादर झाला. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी एआय प्रशिक्षण, दिव्यांगासाठी

तंत्रस्नेही अभिनव योजनांवर भर दिला आहे. खेळाडूंसाठी सुपर २५ क्रीडा प्रबोधीनी योजना राबवणार असल्याचं नमूद केलं आहे. तसंच शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांसाठी विशेष योजना अर्थसंकल्पात सादर केल्याचं जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकरी ओमकार पवार यांनी सांगितलं.

//<><><><><><>//